सकाळ




**गोवा** : सिंफनी लि. कंपनीतर्फे आयोजित 'चेअरमन क्लब' कार्यक्रमात नवीन उत्पादनांचे अनावरण करताना कंपनीचे अधिकारी व भागीदार.

# सिंफनी कंपनीचे नवे कूलर, वॉटर गीझर बाजारात दाखल

**पुणे, ता. २३ :** सिंफनी लि. कंपनीने गोव्यात 'चेअरमन क्लब' कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन केले होते. यावेळी कूलरच्या श्रेणीतील काही नवीन उत्पादने लॉंच करण्यात आली, तसेच कंपनीने प्रथमच वॉटर हिटर श्रेणीमधील उत्पादनांचेही अनावरण केले.

कंपनीने वॉटर हिटर श्रेणीमध्ये स्पा, सौना आणि सोल या तीन नावीन्यपूर्ण उत्पादनांचे अनावरण केले. ही तिन्ही उत्पादने १०, १५ आणि २५ लिटरच्या क्षमतेत उपलब्ध आहेत. पाण्यामुळे होणारे केसांचे अथवा त्वचेचे नुकसान यांसारख्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी ही विशेष उत्पादने तयार केली आहेत. यातील हार्ड वॉटरची तीव्रता कमी करणारी नऊ स्तरीय यंत्रणा केसांचे नुकसान कमी करते आणि त्वचेचे अनेक फायदे मिळवून देते. कंपनीचे अध्यक्ष अचल बाकेरी म्हणाले, ''आमच्या कंपनीचे गीझर्स सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. ग्राहकांच्या गरजा आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालत ही उत्पादने तयार केली आहेत. ग्राहकांना ती नक्कीच पसंत पडतील.'' कंपनीचे महत्त्वाचे ट्रेड पार्टनर या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांचा सत्कार कंपनीतर्फे करण्यात आला.